Partner Organisation

प्रेरणादायी कथा

# तुमचीही मुलं स्वमग्रतेच्या (AUTISM) कक्षेत तर नाहीत ना ?

आजच्या डिजिटल युगात मुलांच्या वागण्या-बोलण्यात बदल जाणवणे स्वाभाविक आहे... पण काही वेळा हे बदल फक्त सवयी नसतात — ते स्वमग्रतेची (Autism) लक्षणे असू शकतात.




## स्वमग्रता म्हणजे काय?

स्वमग्रता हा मेंदूच्या विकासाशी संबंधित एक न्यूरोडेव्हलपमेंटल कंडिशन आहे. ही कोणतीही “आजारपण” नसून, मुलांच्या विचार, संवाद आणि वागणूक यामध्ये वेगळेपणा दिसून येतो.


## लवकर ओळख का महत्त्वाची ?

- लवकर ओळख झाली तर योग्य प्रशिक्षण आणि थेरपीने मुलांमध्ये खूप चांगला बदल घडवता येतो
- संवाद कौशल्य, वागणूक आणि सामाजिक समज सुधारता येते
- मुलांना त्यांच्या क्षमतेनुसार प्रगतीची संधी मिळते



## लहान मुलांमध्ये दिसणारी काही लक्षणे

- नावाने हाक मारल्यावर प्रतिसाद न देणे
- डोळ्यात डोळे मिळवणे टाळणे
- बोलायला उशीर होणे किंवा कमी बोलणे
- एकच कृती वारंवार करणे (उदा. हात हलवणे, फिरत राहणे)
- एकटे राहणे पसंत करणे
- आपण सांगितलेले शब्द/वाक्य पुन्हा पुन्हा म्हणणे
- आवाज, स्पर्श, प्रकाश याबद्दल जास्त संवेदनशीलता
- काल्पनिक खेळ (Pretend Play) कमी असणे
- ही लक्षणे दिसली म्हणजे लगेच घाबरण्याचे कारण नाही, पण तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे



## तुम्हाला माहिती आहे का ?

### प्रमाण काय सांगते?

आज जगभरात अंदाजे प्रत्येक 36 मुलांपैकी 1 मुलामध्ये स्वमग्नतेची लक्षणे आढळतात.
म्हणूनच जागरूकता खूप आवश्यक आहे.

### पण लक्षात ठेवा

स्क्रीन टाइम हा स्वमग्नतेचा कारण नाही, मात्र तो लक्षणे वाढवू शकतो.

### स्वमग्न मुलांमध्ये विशेष गुणही असू शकतात

काही मुलं गणित, चित्रकला, संगीत किंवा स्मरणशक्तीत खूप चांगली असतात.
विशिष्ट गोष्टींमध्ये अत्यंत लक्ष केंद्रीत करू शकतात

### योग्य मार्गदर्शन मिळाल्यास हीच त्यांची ताकद बनू शकते

### पालकांनी काय करावे ?

- मुलांशी जास्तीत जास्त संवाद साधा
- एकत्र खेळा, गोष्टी सांगा
- स्क्रीन टाइम मर्यादित ठेवा
- इतर मुलांमध्ये मिसळण्याची संधी द्या
- लक्षणे दिसल्यास विलंब न करता तज्ञांचा सल्ला घ्या

## समर्पणचा संदेश

### प्रत्येक मूल वेगळं असतं...

आणि प्रत्येक मुलामध्ये क्षमता असते. फक्त योग्य वेळी योग्य दिशा मिळणे गरजेचे आहे.
लवकर ओळख, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळेच बदल शक्य आहे

### मदतीसाठी संपर्क करा

Samarpan Multi-Disability Rehab Centre Kasturba Hospital , Opp Main Post office Lane No 1 , Dhule

- Mobile - 8010895177
- Landline - 02562 313903





